ठाणे-पालघर दुष्काळाच्या यादीतून बाहेर

कोकणात १२ तालुक्यांत दुष्काळ जाहीर, संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर, रायगडला अक्षता

ठाणे/रत्नागिरी/सिंधुदुर्ग : पुढारी वृत्तसेवा

राज्यातील २६५ तालुक्यांत दुष्काळी सवलतींचा आधार मिळाला असताना ठाणे आणि पालघर जिल्ह्याच्या वाट्याला मात्र एकही दुष्काळी तालुका आलेला नाही. शासनाच्या २५ सप्टेंबरच्या निर्णयात दोन्ही जिल्ह्यांतील एकाही तालुक्यात 'ट्रिगर-१' लागू करण्यात आलेला नसल्याने राज्यातील शेतकऱ्यांना विविध सवलतींचा दिलासा मिळत असताना ठाणे-पालघरमधील शेतकरी या मदतीच्या यादीबाहेरच राहिले आहेत.रायगडलाही अक्षता लावण्यात आल्या आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा १०० टक्के तर रत्नागिरीत ३० टक्के तालुके दुष्काळग्रस्त जाहीर झाले आहेत.

ठाणे आणि पालघर जिल्ह्यात जून-जुलैमध्ये चांगला पाऊस झाला असला तरी त्यानंतर पावसाने मोठी दडी मारली आहे. त्यातच ऐन भातपीक तयार होण्याच्या काळात भाताचे दाणे भरण्याची अर्थात पोटरीची अवस्था सुरू आहे. याच निर्णायक टप्प्यात पावसाची नितांत गरज असताना पाऊस गायब झाल्याने हाताशी आलेले भातपीक धोक्यात आले आहे. पालघरमधील बहुतांश शेतकरी आर्थिकदृष्ट्या कमकुवत असून बारमाही शेती किंवा नगदी पिकांचे पर्याय मर्यादित आहेत. त्यामुळे भातपीक हेच त्यांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. हे पीक हातचे गेले तर शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडण्याची भीती निर्माण झाली आहे.ही प्रक्रिया दुष्काळ जाहीर केलेल्या तालुक्यांपुरतीच मर्यादित राहिल्यास पालघरमधील प्रत्यक्ष नुकसान शासनाच्या नजरेसमोर येणार कसे? असा प्रश्न शेतकरी उपस्थित करीत आहेत.खरीप हंगामात जून ते आजपर्यंत पर्जन्यांची तूट व इतर कारणांमुळे २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. ट्रिगर एक अंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नागिरी, संगमेश्वर आणि राजापूर या तीन तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाल्यामुळे या तीन्ही तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. लवकरच जिल्हा प्रशासनाच्या वतीने पंचनामे करून पीक परिस्थितीचा अहवाल शासनाला पाठवण्यात येणार आहे. त्यामुळे तीन तालुक्यातील भात व नाचणी उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.२०२६ च्या खरीप हंगामात झालेली पावसाची अनियमितता व तूट लक्षात घेता, मदत व पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबर २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ८ तालुक्यांमध्ये प्रथम कळ अंतर्गत दुष्काळसदृश परिस्थिती घोषित केली आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली, कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड आणि वेंगुर्ला या सर्व ८ तालुक्यांतील बळीराजाला मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. राज्यातील तालुक्यांमध्ये जून ते आज पर्यंत या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचे आयुक्त, कृषी यांच्या अहवालावरून दिसून येते.



पालघरला न्याय द्या

पालघर जिल्ह्यातील शेती तुटपुंजी असून बहुतांश शेतकरी भातपिकावर अवलंबून आहेत. बाकी भागातील शेतीप्रमाणे केवळ शेतीतील ओलाव्यावर येणारे हरभरा अशीच तत्सम पिके या भागात घेण्यात येत नाही. म्हणजेच राज्यभरातील शेतकरी एक पीक गेले तर दुसरे पीक घेऊन शेती करू शकतात. यापूर्वी आंबा पिकाच्या नुकसानीच्या वेळी काही भागांत प्रत्यक्ष नुकसान कमी असतानाही सरसकट नुकसान जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा देण्यात आला होता. त्याच धर्तीवर पालघर जिल्ह्यातील तालुकानिहाय प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दुष्काळी सवलतींच्या कक्षेत आणावे, अशी मागणी होत आहे.

बाटली फेकल्याप्रकरणी वृद्धाला अटक

रत्नागिरी : गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान सोड्याची बाटली फेकल्याप्रकरणी शहर पोलिसांनी एका ७० वर्षीय संशयिताला अटक केली. ही घटना शुक्रवार २५ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास झारणी रोड परिसरात घडली. याप्रकरणी दिलेल्या तक्रारीनूसार काहीजण घरगुती गणपतीच्या विसर्जनासाठी मिरवणुकीने जात असताना एका इमारतीच्या पहिल्या मजल्यावरून संशयिताने मिरवणुकीच्या दिशेने सोड्याची बाटली फेकली. याप्रकरणी तक्रार दाखल झाल्यानंतर शहर पोलिसांनी संशयिताला तातडीने अटक केली. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवारी संशयिताला न्यायालयात हजर करण्यात आले असून पोलीस तपास करत आहेत.

विसर्जन मिरवणुकीत बेदम मारहाण

मारहाणीचा व्हीडिओ व्हायरल, भिवंडीतील प्रकार

भिवंडी : पुढारी वृत्तसेवा

भिवंडीत सर्वत्र गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडत असताना छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मिरवणुकीतील एका युवकास बेदम मारहाण करण्याची घटना घडली असून या मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. जखमी युवकाचे नाव ऋषिकेश जितेंद्र वगळ (वय 30) असे आहे.

अजय नगर मित्र मंडळाची गणेश विसर्जन मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात आली असता मंडळातील कार्यकर्ते ऋषिकेश जितेंद्र वगळ याला एका गणेश मंडळातील कार्यकर्त्यांच्या जमावाने त्यास घेरून जबरदस्त मारहाण केली आहे. या मारहाणीत ऋषिकेशच्या नाकाला व डोक्याला दुखापत झाली आहे. जखमी अवस्थेत त्याला तातडीने आय जी एम रुग्णालयात नेण्यात आले, तेथे प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी त्याला खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे. या घटनेचा व्हिडीओ समोर आला असून व्हिडीओत अनेक जण एका तरुणाला मारहाण करताना दिसत आहेत. निजामपूर पोलीस ठाणे पोलिसांनी या प्रकरणी तपास सुरू केला आहे. ही मारहाण पालिका निवडणुकीतील वादातून झाल्याचे बोलले जात असून, नक्की किती जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे ही माहिती पोलिसांकडून मिळू शकली नाही.

फुलगावकर यांचे निधन

डोंबिवली : विनोदी, मिश्किल, न थकणारा, सतत कार्यरत राहणारा आणि विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवणारा जिंदादिल व्यक्तिमत्व म्हणून परिचित असलेले संदीप फुलगावकर यांचे शुक्रवारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या जाण्याने सामाजिक, रोटरी आणि आदिवासी सेवाभावी क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

पश्चिम रेल्वे

दूरसंचार सुविधा पुरवणे

वरिष्ठ विभागीय सिग्नल आणि टेलिकॉम इंजिनिअर (समन्वय)/बी.सी.टी. **ई-निविदा क्र.: MMCT-SnT-STTD-29-2026, दिनांक: २४/०९/२०२६** मागवत आहेत. **कामाचे नाव १.** महालक्ष्मी, मुंबई विभाग येथे टाईप-VI, टाईप-V आणि ट्रान्सिट क्वार्टर्सचे बांधकाम आणि २. जगजीवन राम रुग्णालय, मुंबई सेंट्रल येथील विविध विभागांची सुधारणा व नूतनीकरण यांच्याशी संबंधित दूरसंचार सुविधा पुरवणे. **कामाचा अंदाजित खर्च:** ₹ ४७,९६,१३७.८८ **बयाणा रक्कम:** ₹ ९५,९००/- **ई-निविदा कागदपत्रे सबमिट करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** १५.१०.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत. **ई-निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** १५.१०.२०२६ रोजी १५.३० वाजता अधिक तपशिलांसाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या. 0640

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

अनंत चतुर्दशीला भक्तिमय वातावरणात बाप्पाला निरोप

डोंबिवली : पुढारी वृत्तसेवा

शुक्रवारी अनंत चतुर्दशीच्या दिवशी अत्यंत भक्तिमय आणि भावपूर्ण वातावरणात कल्याण-डोंबिवलीतील श्री गणेश मूर्तींचे विसर्जन मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. पोलिसांच्या सहकार्याने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह सेवाभावी आणि सामाजिक संस्था, नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे स्वयंसेवक आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मदतीने विविध विसर्जन स्थळांवर ही विसर्जन प्रक्रिया संपन्न झाली. हजारो गणेश भक्तांनी आपल्या परंपरेची जपणूक करत दाटलेल्या मनाने आणि साश्रू नयनांनी आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला.

महामार्ग ठेकेदाराला १८ कोटींचा दंड

देवरुख : पुढारी वृत्तसेवा

महामार्गाच्या कामासाठी खडीचा पुरवठा करण्यासाठी संगमेश्वर तालुक्यातील वांद्री येथे उभारण्यात आलेल्या क्रशर प्रकल्प परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत उत्खनन झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. जिल्हा खनिकर्म विभागाच्या कारवाईनुसार तब्बल ५९ हजार ९१० ब्रास दगडाचे उत्खनन झाल्याप्रकरणी संबंधित कंपनीला फेब्रुवारी २०२६ मध्ये तब्बल ३ कोटी ५९ लाख ४३ हजार रुपयांच्या दंडाची नोटीस बजावली होती. प्रशासकीय सूत्रांनुसार, विहित मुदतीत दंडाची रक्कम न भरल्यास शासनाच्या ३ मे २०२१ रोजीच्या अध्यादेशातील तरतुदीनुसार दंडाची रक्कम वाढविण्याची कार्यवाही करता येते. त्यानुसार थकीत दंडाची रक्कम आता १७ कोटी ९७ लाख रुपयांपर्यंत पोहोचल्याचे संबंधित विभागाकडून सांगण्यात आले. दरम्यान, मुंबई-गोवा महामार्गावरील आरवली ते तळेकांटे या टप्प्याचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीकडून महसूल व उत्खननाच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचे समोर आले आहे.

एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी गोळा केला १,००० किलो कचरा

मुंबई : एसएनडीटी महिला विद्यापीठांतर्गत मुंबई विभागातील महाविद्यालयातील एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी शनिवारी स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदवला.

मुंबई, पुढारी वृत्तसेवा

पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ बदलापूर इंडस्ट्रियल एरिया, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४२ यांच्यावतीने एसएनडीटी महिला विद्यापीठांतर्गत मुंबई विभागातील महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागांच्या सहकार्याने दादर चौपाटी येथे समुद्रकिनारा स्वच्छता मोहिमेचे आयोजन केले होते. या वेळी १,००० किलोहून अधिक कचरा संकलित करण्यात आला.

या वेळी ४०० हून अधिक एनएसएस स्वयंसेवक, १३ एनएसएस कार्यक्रम अधिकारी, रोटरी सभासद सहभागी झाले होते. तसेच पीव्हीडीटी कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वुमेन, लीलाबाई ठाकरसी कॉलेज ऑफ नर्सिंग, श्रीमती मनीबेन एम. पी. शाह महिला कला व वाणिज्य महाविद्यालय, श्रीमती पी. एन. दोशी महिला महाविद्यालय, बी. एम. रुईया गर्ल्स कॉलेज आणि सीताराम देओरा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज या विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी व स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

या वेळी स्वयंसेवकांनी दादर चौपाटीच्या समुद्रकिनाऱ्यावर साचलेला कचरा संकलित केला. या मोहिमेचे नेतृत्व रोटरी क्लब ऑफ बदलापूर इंडस्ट्रियल एरियाचे अध्यक्ष डॉ. अमोल उबाळे आणि सचिव रोटेरियन वीणा पढेर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. क्लबचे माजी अध्यक्ष कपिल पढेर आणि शरद मोरे यांनीही उपस्थित राहून या उपक्रमाला मोलाचे सहकार्य केले.

SBI भारतीय स्टेट बैंक State Bank of India

गृह कर्ज केंद्र, कल्याण
तळमजला आणि १ ला मजला, मिलेनियम हाईट्स, शहाड मोहोणे रोड, शहाड, कल्याण (पश्चिम) - ४२११०३.

[नियम ८(१)] ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, खाली स्वाक्षरी करणारे सिक्युरिटायझेशन अँड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये भारतीय स्टेट बँकेचे अधिकृत अधिकारी म्हणून आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ९ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, **कर्जदार श्री. इरफान अब्दुल जलील मोमीन खाते क्र. ४३३४६६९८४४५** यांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेत नमूद केलेली रक्कम म्हणजेच **रु. १९,५५,१५२.००/- (रुपये एकोणीस लाख पंचावन्न हजार एकशे बावन रुपये फक्त)** भरण्याचे आवाहन करणारी दिनांक ०९.०६.२०२६ रोजीची मागणी सूचना जारी केली होती.
कर्जदार रक्कम परत करण्यात अपयशी ठरल्यामुळे, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, खाली स्वाक्षरी करणाऱ्यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) अन्वये आणि सदर नियमांच्या नियम ९ सह वाचल्या जाणाऱ्या अधिकारांचा वापर करून **वर्ष २०२६ च्या सप्टेंबर महिन्याच्या २४ व्या दिवशी** खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.
विशेषत: कर्जदार/जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तेचा कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार भारतीय स्टेट बँकेच्या **रु. १९,५५,१५२.००/-** या रकमेवर तसेच त्यावरील व्याज आणि इतर शुल्कांच्या अधीन राहील.
तारण ठेवलेली मालमत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यत येत आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन:
फ्लॅट क्र. ३०६, ३ रा मजला, कृष्णा पॅराडाईज बिल्डिंग, मौजे ममदौर, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड, पिन ४१०१०१.
दिनांक: २४.०९.२०२६ — अधिकृत अधिकारी
ठिकाण: ठाणे — स्टेट बँक ऑफ इंडिया

मध्य रेल्वे

साहित्य व्यवस्थापन विभाग

ई-निविदा सूचना क्रमांक: एनआयटी/०९/२६/४३,दिनांक: २४-सप्टेंबर-२०२६

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, प्रधान मुख्य साहित्य व्यवस्थापक, मध्य रेल्वे खालील वस्तूंच्या पुरवठ्यासाठी ई-निविदा मागवित आहेत:

निविदा क्रमांक	तपशील	प्रमाण	अंतिम दिनांक
३८२६३२३२ए	आरडीएसओ स्केच-९४२५४ नुसार बफर प्लंजरसाठी फेस प्लेट	२९९७ नग	१३-ऑक्टोबर-२६
२७२६४८०९ए	मशिन्ड स्टेटरचे संबंधित घटक	४० सेट	१२-ऑक्टोबर-२६
२७२६४८५४	डब्ल्यूएजी-७ साठी नॉर्मल रोलर बेअरिंगसह एक्सल बॉक्स असेंब्लीचा संपूर्ण सेट	०६ सेट	१२-ऑक्टोबर-२६
३८२६४३०९	आरसीएफ ड्रॉइंग क्रमांक एलजी०५१०१ नुसार एलएचबी नॉन-एसी डब्यांसाठी सेकंडरी स्प्रिंग (बाहेरची)	२४४ नग	०२-नोव्हेंबर-२६
३८२६५११५	आरडीएसओ ड्रॉइंग क्रमांक एसके-९९००२ च्या स्क्रू कपलिंग एक्सट्रॅक्टसाठी स्क्रू ५८ व्यास एक्स ४५३	२०६५ नग	२७-ऑक्टोबर-२६
३८२६३४८९	मालवाहू स्टॉकसाठी ड्राफ्ट गिअर फॉलोअरसह ड्राफ्ट गिअर व्यवस्था	२५०६ नग	२८-ऑक्टोबर-२६
५१२६६०८५ए	आरडीएसओ ड्रॉइंग क्रमांक टी-१०३४६ नुसार ६.२ मिमी जाडीच्या सीजीआरएसपीच्या निर्मिती आणि पुरवठ्यासाठी चालू कंत्राट	२४२३८ नग	१५-ऑक्टोबर-२६
८०२६४४५१बी	सीपीसीबी-II निकषांचे पालन करणाऱ्या डिझेल इंजिनसाठी योग्य हाय ल्यूब ऑइल एपीआय सीआय ४ प्लस ग्रेड वंगण तेल	६९३०० लीटर	२१-ऑक्टोबर-२६
३८२६३११६	फियाट ड्रॉइंग क्रमांक १२६९५१३ नुसार चेअर कारसाठी सेकंडरी स्प्रिंग (आतील)	३२२ नग	०२-नोव्हेंबर-२६
५१२६६०९३	प्रिस्ट्रेस्ड मोनोब्लॉक काँक्रीटच्या निर्मिती आणि पुरवठ्यासाठी चालू कंत्राट	टी-९७९०-८१४ सेट टी-९८४१-६४२ सेट	१२-ऑक्टोबर-२६

टीप: वरील सर्व नमूद केलेल्या निविदा या ई-निविदा आहेत आणि सर्व निविदाकारांना विनंती आहे की त्यांनी आपल्या बोली (बिड्स) ऑनलाइन पद्धतीने आयआरईपीएसच्या संकेतस्थळावर म्हणजेच https://www.ireps.gov.in येथे सादर कराव्यात. वरील नमूद निविदा आणि इतर पुरवठा निविदांबाबत अधिक तपशिलांसाठी कृपया आयआरईपीएसच्या संकेतस्थळाला भेट द्या.
AK-610 — प्रधान मुख्य साहित्य व्यवस्थापक
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरुन प्रवास करणे टाळा

विशेष वसुली आणि विक्री अधिकारी यांचे कार्यालय
अरवल्ली बिझनेस सेंटर (फूल महल), रामदास सुत्राळे मार्ग, ऑफ सोडावाला लेन , बोरिवली (प.), मुंबई ४०० ०९२.
दूरध्वनी: ०२२-६९०३७९४१ ते ४६.
(जनसेवा सहकारी बँक (बोरिवली) लिमिटेडशी संलग्नित)

प्रपत्र "झेड"
(नियम १०७ चा पोटनियम ११ (डी-१) पहा)

स्थावर मिळकतीकरिता कब्जा सूचना

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये जनसेवा सहकारी बँक (बोरिवली) लि. चे निम्नस्वाक्षरीकार **वसुली अधिकारी** यांनी दिनांक **१८/०२/२०२१ रोजी मागणी सूचना** जारी केली होती. ही **वसुली प्रमाणपत्र क्र. १०१/१५५७/२०२० दिनांक १८/०१/२०२१** अन्वये तसेच जप्ती आदेश सूचना **दि. १९/०९/२०२६** अन्वये मुख्य कर्जदार (जजमेंट डेटर्स) म्हणजेच कर्जदार आणि जामीनदार यांना जारी करण्यात आली होती.
श्री. राजेश द्वारकादास अह्या आणि सौ. भारती राजेश अह्या (कर्ज खाते क्र. ०५/१५२/२२४) यांच्यासह सह-कर्जदार **श्री. मनमोहन महादेव भंडारी आणि श्री. दिनेश रामब्रिज यादव यांनी** १८/०२/२०२१ च्या मागणी सूचनेत नमूद केलेली रक्कम म्हणजेच दिनांक **३१/०१/२०२१** पर्यंतची **₹ २२,५०,५७२.०६ (अक्षरी रुपये बावीस लाख पन्नास हजार पाचशे बाहत्तर आणि पैसे सहा फक्त)** अधिक पुढील व्याज **११.००% प्रतिवर्ष** दराने पूर्ण वसुली होईपर्यंत जमा करणे आवश्यक होते. सूचना मिळूनही कर्जदार ही रक्कम भरण्यास अपयशी ठरल्याने, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेची जप्ती सूचना जारी करून ताबा घेतला आहे.
कर्जदार रक्कम भरण्यास अपयशी ठरल्यामुळे, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी **महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ च्या नियम १०७ {११ (डी-१)} अन्वये** मिळालेल्या अधिकारांचा वापर करून आज **१९ सप्टेंबर, २०२६** रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **सांकेतिक ताबा** घेतला आहे.
विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, त्यांनी या मालमत्तेचा कोणताही व्यवहार करू नये. या मालमत्तेचा कोणताही व्यवहार **जनसेवा सहकारी बँक (बोरिवली) लि., मुंबई** यांच्या **₹ ६,५४,७२८.०२ (अक्षरी रुपये सहा लाख चौपन्न हजार सातशे अठ्ठावीस आणि पैसे दोन फक्त)** या रकमेच्या आणि त्यावर दिनांक **३१/०८/२०२६** पासून लागणाऱ्या **११.००%** प्रतिवर्ष पुढील व्याजाच्या बोजाधीन (चार्ज) राहील.

स्थावर मालमत्तेचे वर्णन
रूम नं. बी-२१ चा सर्व तो भाग आणि तुकडा, ज्याचे बिल्ट-अप क्षेत्रफळ २५ चौ. मीटर आहे, जी चारकोप (१) नंदादीप ज्योती को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., प्लॉट नं. ३८१, रोड नं. आरएससी-३०, सेक्टर-३, चारकोप, कांदिवली-पश्चिम, मुंबई-४०० ०६७ येथे स्थित आहे. सोसायटी नोंदणी क्र. बीओएम/(डब्ल्यु-आर)/एचएसजी(टीओ)/५६५२/१९९१-९२, कांदिवली गाव, तालुका बोरिवली, एम.एस.डी. (मालकी: श्री. राजेश द्वारकादास अह्या आणि सौ. भारती राजेश अह्या).

स्वाक्षरी/-
विशेष वसुली आणि विक्री अधिकारी
दिनांक : १९/०९/२०२६ — महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० सह वाचित
स्थान : मुंबई. — महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७
* उपरोल्लेखित मराठी मजकुरामध्ये काही संदिग्धता असल्यास / आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.

जा.क्र. न्याय/ध.स.आ. १/५०५७/२०२६
धर्मादाय आयुक्त भवन,
२ रा मजला, सास्मिरा इमारत, सास्मिरा रोड,
वरळी, मुंबई - ४०० ०३०.
दिनांक - २२/०९/२०२६

जाहिर नोटिस
महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५०, कलम ४७ अन्वये खालील नमुद न्यासात विश्वस्तांची नेमणूक करणे बाबत

अर्ज क्रमांक :- ८९/२०२४
न्यासाचे नाव :- "इंडियन एसोसिएशन फॉर रेडिएशन प्रोटेक्शन"
न्यास नोंदणी क्रं :- एफ-१८०० (मुंबई)

१. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४७ अन्वये दाखल अर्ज क्रमांक **८९/२०२४** मधील अर्ज निशाणी क्रमांक १ वर मा. धर्मादाय सह आयुक्त-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक **११/०८/२०२६** रोजी आदेश पारीत केला आहे. सदर आदेशानुसार संबंधित लोकांना व आम जनतेला या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, :- **"इंडियन एसोसिएशन फॉर रेडिएशन प्रोटेक्शन" नोंदणी क्रं. एफ-१८०० (मुंबई)"** या न्यासात विश्वस्तांची नेमणुक करणेकरीता अर्जदार यांनी सदर अर्ज दाखल केला आहे.
२. अर्जदाराने नि. क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे न्यास नोंदणीच्या वेळी न्यासाचे कामकाज पाहण्यासाठी खालील व्यक्ती होते.
१. डॉ. यू. सी. मिश्रा — ८. डॉ. श्रीमती ज्योती व्ही एस
२. डॉ. एस. सी. जैन — ९. डॉ. व्ही. व्ही. कुलकर्णी
३. डॉ. बी. सी. भट — १०. डॉ. ए. जी. हेडगे
४. डॉ. बी. के. एस. मूर्ती — ११. डॉ. ए. एम. भागवत
५. श्री. के. के. नारायणन — १२. श्री. एस. जे. राऊत
६. डॉ. एस. पी. कथुरिया — १३. श्री. जे. भाटी
७. डॉ. ए. एस. प्रधान — १४. डॉ. ओ. पी. मस्संड
३. अर्जदार यांनी खालील विश्वस्तांची न्यासाच्या विश्वस्तपदी नेमणूक करण्यासाठी विनंती केली आहे. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.
१. श्री. प्रोबल चौधरी — ८. डॉ शशांक सुरेश सैंदन
२. डॉ. एस चंद्रशेखरन — ९. श्री नरेंद्र खंडेलवाल
३. डॉ. एस आनंद — १०. डॉ.सुरेश शांताराम सनये
४. श्री एस एम प्रधान — ११. श्री. देविदास सिद्धेश्वर पाटकुलकर
५. श्रीमती. रुपाली सी के कामत — १२. डॉ. डी ए राजू बाबू
६. डॉ. चित्रा सुब्रमण्यम, — १३. डॉ नथुराम रोहिला
७. डॉ. सुनील कुमार सिंग
४. सदरचे प्रकरण उपरोक्त नमुद व्यक्तींची न्यासात विश्वस्तपदी नेमणुक करण्यासाठी मा. धर्मादाय सह आयुक्त-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे समोर दिनांक ०३/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता ठेवण्यात आले आहे. तरी वरील नमुद पदनियुक्ती बाबत कोणाला काही हरकती/आक्षेप किंवा काही सांगावयाचे असल्यास त्यांनी स्वतः सदर नोटीस जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांपर्यंत या कार्यालयात हजर राहुन लेखी हरकत किंवा म्हणणे मांडावे. जर कोणीही हजर न राहिल्यास आपणास काहीही हरकत / म्हणणे मांडावयाचे नाही असे गृहीत धरुन योग्य तो कायदेशीर न्याय निर्णय घेण्यात येईल याची आपण सर्वांनी नोंद घ्यावी.
ही नोटीस माझे सही व मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिक्यानिशी आज दिनांक २२/०९/२०२६ रोजी दिली.
शिक्का
(स. ए. बुरघाटे)
अधिक्षक (न्याय),
धर्मादाय आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

punjab national bank ...the name you can BANK upon!
तणावग्रस्त मालमत्ता व्यवस्थापन शाखा, मुंबई
पीएनबी प्रगती टॉवर, १ ला मजला, प्लॉट नं. सी-९, जी-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ ईमेल: zs8356pnb.bank.in

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

वित्तीय मालमत्तेचे प्रतिभूतीकरण आणि पुनर्रचना आणि प्रतिभूती व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(६) आणि नियम ९(१) च्या तरतुदी वाचून, प्रतिभूती व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
सर्वसाधारण जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचना दिली जाते की, सुरक्षित कर्जदाराकडे गहाण/प्रभारित केलेली खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, ज्याचा प्रतीकात्मक ताबा बँकेच्या/सुरक्षित कर्जदाराच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, ती ''जे आहे जिथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे'' या तत्त्वावर संबंधित कर्जदार आणि हमीदार यांच्याकडून बँकेला/सुरक्षित कर्जदाराला येणेबाकी असलेल्या वसुलीसाठी, खालील तक्त्यात नमूद केलेल्या तारखेला विकली जाईल. संबंधित मालमत्तेसाठी राखीव किंमत आणि बयाणा रक्कम खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे असेल.

तारण ठेवलेल्या मालमत्तेचे तपशीलवार विवरण

शाखेचे नाव / खात्याचे नाव / कर्जदार/हमीदार यांचे नाव आणि पत्ता	गहाण ठेवलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन/मालकाचे नाव (मालमत्तेचे गहाणदार)	अ) सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(२) नुसार मागणी सूचनेची तारीख ब) थकबाकी रक्कम (रु. मध्ये) क) सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(४) नुसार ताबा घेण्याची तारीख ड) ताब्याचे स्वरूप प्रतीकात्मक/भौतिक/रचनात्मक	अ) राखीव किंमत (रु. मध्ये) ब) बयाणा रक्कम (रु. मध्ये) क) बोली वाढीची रक्कम (रु. मध्ये)	ई-लिलावाची तारीख/वेळ	सुरक्षित कर्जदारांना माहित असलेल्या बोजांचा तपशील
तणावग्रस्त मालमत्ता व्यवस्थापन शाखा, मुंबई					
मे. सुपरमॅक्स पर्सनल केअर प्रायव्हेट लिमिटेड सीए क्षितिज गुप्ता (मे. सुपरमॅक्स पर्सनल केअर प्रायव्हेट लिमिटेडचे आरपी) एफ-५२, पहिला मजला, सेंट्रियम मॉल, लोखंडवाला टाउनशिप, कांदिवली पूर्व, मुंबई - ४००१०१, महाराष्ट्र. एमराल्ड इन्व्हेस्टमेंट्स प्रा. लि., मल्होत्रा हाऊस, ४ था मजला, जीपीओ फोर्ट समोर, मुंबई शहर (म.रा.) - ४००००१. युनिक प्रॉपर्टीज अँड सेक प्रा. लि. मल्होत्रा हाऊस, ४ था मजला, जीपीओ फोर्ट समोर, मुंबई शहर (म.रा.) - ४००००१. विद्युत मेटॅलिक्स प्रा. लि., मल्होत्रा हाऊस, ४ था मजला, जीपीओ फोर्ट समोर, मुंबई शहर (म.रा.) - ४००००१. राकेश मल्होत्रा, ५, रुबन्स अपार्टमेंट, सेफलवाड लेन, नेपियन सी रोडच्या बाजूला, मुंबई (म.रा.) - ४००००६	१/३ मुख्य इमारतीसह ६-३-११८६ महापालिका क्रमांकाच्या परिसराचा भाग असलेली जमीन आणि इमारत आणि संरचनेच्या सीमा भिंतीचा संपूर्ण तुकडा आणि भाग, बेगमपेट, हैदराबाद येथे स्थित, ज्याचे क्षेत्रफळ ३३३ चौ. यार्ड आणि उघडी जमीन आणि बाहेरील घरे २००० हजार चौ. यार्ड. एकूण क्षेत्रफळ २३३३ चौ. यार्ड १२ हजार चौ. यार्डपैकी. सामान्यतः ''लक्ष्मी विलास'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ६-३-११८६ परिसराचा भाग. *उघडी जमीन १५४५ चौ.यार्ड, इमारत जमीन ५१४ चौ.यार्ड, वास्तविक एकूण जमीन - २०५९ चौ.यार्ड अंदाजे) (रस्ता रुंदीकरणात विविध टप्प्यांवर बरीच जमीन गेली आहे)	अ) १४.०३.२०२३ ब) रु. ५७,४०,७५,७९६.३८ (रुपये सत्तावन्न कोटी चाळीस लाख पंच्याहत्तर हजार सातशे शहाण्णव आणि अडतीस पैसे फक्त) १३.०३.२०२३ रोजी अधिक एनपीएच्या तारखेपासून पुढील व्याज आणि खर्च, वजा झालेली वसुली (असल्यास).	राखीव किंमत: रु ६०,३६,००,०००/- बयाणा रक्कम: रु. ६,०३,६०,०००/- बोली वाढ: रु. ५०,००,०००/-	०३/११/२०२६ स. ११ ते दु. ४:०० पर्यंत	माहित नाही
	मे. विद्युत मेटॅलिक्स प्रा. लि. च्या नावावर सर्व्हे नं २९, हिस्सा नं १/१. टक्का नं २, २१ सीटीएस नं ३९ आणि सर्व्हे नं २९, हिस्सा नं १/३(भाग), सीटीएस नं ४५, पनामा क्वार्टर्स, संत नामदेव पथ, बर्फ कारखान्या जवळ, नौपाडा गाव, ठाणे-पश्चिम-४००६०२ (म.रा.) येथील मालमत्ता, क्षेत्रफळ ४०२२.२२ चौरस यार्ड (म्हणजे ३३६२.५८ चौरस मीटर)	क) (i) २७.०८.२०२६ (ii) २५.०८.२०२६ ड) प्रतीकात्मक ताबा	राखीव किंमत: रु. ४४,६४,००,०००/- बयाणा रक्कम: रू. ४,४६,४०,०००/- बोली वाढ: रु. ५०,००,०००/-	०३/११/२०२६ स. ११ ते दु. ४:०० पर्यंत	माहित नाही

सुरक्षित मालमत्तेचे अनुसूची सपर्क व्यक्ती: श्री. नीरज महाल्का, अधिकृत अधिकारी, एसएएम शाखा मुंबई, मोबाईल: ९५५९०८१७७७

नियम आणि अटी: विक्री प्रतिभूती व्याज (अंमलबजावणी) नियम २००२ मध्ये विहित केलेल्या नियम आणि अटी आणि खालील पुढील अटींच्या अधीन असेल:
१. मालमत्ता ''जे आहे जिथे आहे'' आणि ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे'' या तत्त्वावर विकली जात आहे.
२. वरील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेचा तपशील अधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहितीनुसार सांगण्यात आला आहे, परंतु अधिकृत अधिकारी या जाहीरनाम्यातील कोणत्याही त्रुटी, चुकीचे विधान किंवा वगळल्याबद्दल जबाबदार राहणार नाही.
३. विक्री स्वाक्षरीकर्त्याद्वारे https://baanknet.com या वेबसाइटवर उपलब्ध करून दिलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे दिनांक **०३.११.२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०४.००** या वेळेत केली जाईल.
४. वैयक्तिक हमीदार आणि कॉर्पोरेट हमीदार यांनी टीपी/११, टीपी/१२, टी/१३, टीपी/१४ मध्ये पास केलेल्या दिनांक २९.०७.२०२६ च्या एनसीएलटीच्या आदेशाला एनसीएलएटी नवी दिल्लीसमोर आव्हान दिले आहे जे अजूनही न्यायाधीन आहेत. याशिवाय कर्जदार कंपनी सीआयआरपी अंतर्गत आहे. बँकेने डीआरटी हैदराबादसमोर वसुलीचा दावा दाखल केला आहे.
५. कोणत्याही कोर्ट/ट्रिब्यूनल/प्राधिकरणाच्या आदेशानुसार विक्री रद्द झाल्यास, बँक लिलाव खरेदीदाराला कोणत्याही प्रकारचे व्याज/खर्च/किंमत/शुल्क देण्यास जबाबदार राहणार नाही.
६. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया https://baanknet.com आणि www.pnb.bank.in पहा.
सही/-
दिनांक: २५.०९.२०२६ — अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक
ठिकाण: मुंबई — सुरक्षित कर्जदाराच्या वतीने आणि त्यांच्यासाठी
सरफेसी कायदा, २००२ च्या नियम ८(६) अंतर्गत वैधानिक विक्री सूचना

मध्य रेल्वे

दुरूस्ती आणि देखभालीचे काम

खुले ई-निविदा सूचना क्र. : सीआरगडीआरएम(डब्लू)बीबी-२०२६-४८ दि. २४.०९.२०२६
अनु. क्र. १. कामाचे नाव- अ) सीएलए-वर्ष २०२५-२६ साठी एसएसई(डब्लू) अंतर्गत क्षेत्री कामाऐवजी क्वार्टर्सचे विविध वार्षिक देखभालीचे काम, **ब)** एडीईएन (कार्य) बीवाय अंतर्गत एसएसई (कार्य) सीएलए अंतर्गत एलटीटीच्या गळक्या पीट व्हील लेथची, शेड पीट व्हीलची, खोल गटारींची, प्लास्टर पेंटींग आणि खिडकीची दुरूस्ती, **क)** एसएसई (कार्य) सीएलए अंतर्गत एलटीटी येथे जुन्या आयओएच शेडमधील खराब झालेली फरशी आणि खराब झालेले पाईप चेंबर यांची दुरूस्ती, **ड)** एसएसई (कार्य) सीएलए अंतर्गत डिझेल शेडमध्ये मोठ्या दुरूस्तीसाठी लाईन क्र. ३च्या एका बाजूने जाणाऱ्या मार्गाची दुरूस्ती, **ई)** एसएसई (कार्य) सीएलए अंतर्गत घाटकोपर सेंट्रल येथे वर्दळीचे क्षेत्र आणि सेंट्रल केबिनची दुरूस्ती **अंदाजे मूल्य :** ₹ ६४३.०२ लाख **बयाणा रक्कम :** ₹ १२,८६,०००/- **पूर्ण होण्याचा कालावधी :** १२ महिने.
अनु. क्र. २. कामाचे नाव : कल्याण-इगतपुरी: भाग (अ) टीबीआर-४०.४४२ टी किमी, भाग(ब)-मुख्य आणि यार्ड लाईन्समधील एसईजेचे स्लीपर्ससहीत टीडब्लूएसईजेने पुनर्नूतनीकरण-५० नग, भाग(क)-टीटीआर (संचांमध्ये)-एफएस+टीडब्लूएस+डब्लूसीएमएस २० नग (१:१२) आणि १८ नग (१:८:५), सीएस+सीएमएससी-४ (१:१२) आणि १९ (१:८:५) आणि डीएस-२२ **अंदाजे मूल्य :** ₹ ५५६.२१ लाख **बयाणा रक्कम :** ₹ ११,१२,४००/- **पूर्ण होण्याचा कालावधी :** १२ महिने
अनु. क्र. ३. कामाचे नाव : वरीष्ठ डीईएन (ई)बीबी यांच्या परिक्षेत्रातील डीडब्लू-पनवेल, पनवेल-जेएनपीटी, पनवेल-रोहा, डीडब्लू-बीएसआर विभागातील मार्गाच्या सरेखनातील त्रुटी दूर करण्यासाठी प्रिझ्म जीइडीओ ट्रॉली सर्वेक्षण अंदाजे मूल्य : ₹ १३८.५८ लाख **बयाणा रक्कम :** ₹ २,७७,२००/- **पूर्ण होण्याचा कालावधी :** १२ महिने.
अनु. क्र.४. कामाचे नाव : मुंबई विभागात २ वर्षांसाठी रेल्वे/वेल्ड्सच्या (तात्पुरते) अल्ट्रा सॉनिक चाचणीसाठीआरडीएसओने दिल्याप्रमाणे पुनर्विलोकीत २०२२ नुसार भारतीय रेल्वेच्या मानक वैशिष्ट्यांप्रमाणे वेल्ड्सची चाचणी **अंदाजे मूल्य :** ₹ ४४१.८१ लाख **बयाणा रक्कम :** ₹ ८,८३,६००/- **पूर्ण होण्याचा कालावधी :** २४ महिने.
अनु. क्र.५. कामाचे नाव : यार्ड सुधारणेचे काम : वरीष्ठ डीईएन/एनई/बीबी विभागांतर्गत कल्याण, कसारा आणि इगतपुरी यार्ड येथे सेस (रेल्वे मार्गाच्या बाजूचा पट्टा) ची पातळी कमी करून जलनिस्सारण व्यवस्थेत सुधारणा करणे.
अंदाजे मूल्य : ₹ ४०९.०५ लाख **बयाणा रक्कम :** ₹ ८,१८,१००/- **पूर्ण होण्याचा कालावधी :** ०८ महिने
अनु. क्र.६. कामाचे नाव : अ) डीआर-पीआर-एमटीएन-सायन-जीटीबीएन-एसएसई(डब्लू) डीआर अंतर्गत २४ महिन्यांसाठी वसाहतींसाठी विविध सामग्रीचा पुरवठा करण्यासोबत देखभालीच्या कामासाठी सेवा देणे, **ब)** सीएलए-व्हीव्हीएच-टीएमबीवाय-एसएसई(डब्लू) सीएलए अंतर्गत २४ महिन्यांसाठी वसाहतींसाठी विविध सामग्रीचा पुरवठा करण्यासोबत देखभालीच्या कामासाठी सेवा देणे, **अंदाजे मूल्य :** ₹ ४७२.९८ लाख **बयाणा रक्कम :** ₹ ३,८६,५००/- **पूर्ण होण्याचा कालावधी :** २४ महिने.
अनु. क्र.७. कामाचे नाव- टीएनए-कळवा -एसएसई(डब्लू) टीएनए अंतर्गत २४ महिन्यांसाठी वसाहतींसाठी विविध सामग्रीचा पुरवठा करण्यासोबत देखभालीच्या कामासाठी सेवा देणे, **अंदाजे मूल्य :** ₹ १३५.९३ लाख **बयाणा रक्कम :** ₹ २,१८,०००/- **पूर्ण होण्याचा कालावधी** - २४ महिने.
अनु. क्र. ८. कामाचे नाव : वरीष्ठ डीईएन(एनई)सीएसएमटी यांच्या परिक्षेत्रांतर्गत टीएलए,व्हीएसडी, केडीव्ही आणि एएसओ येथील क्वार्टर्सची किरकोळ दुरूस्ती आणि देखभाल. **अंदाजे मूल्य :** ₹ १६४.११ लाख **बयाणा रक्कम :** ₹ ३,२८,२००/- **पूर्ण होण्याचा कालावधी :** १२ महिने.
अनु. क्र.९. कामाचे नाव- वरीष्ठ डीईएन/एनई विभागांतर्गत २०२६ साठी एसएसई पी वे कसाराअंतर्गत ३ऱ्या लाईनसाठी विविध पी. वे काम **अंदाजे मूल्य :** ₹ ११२.११ लाख **बयाणा रक्कम :** ₹ २,२४,२००/- **पूर्ण होण्याचा कालावधी :** १२ महिने.
१. वरील निविदाची बंद होण्याचा दिनांक आणि वेळ : अनु. क्र. २,४,५,६,७ आणि ९ साठी १३.१०.२०२६ रोजी १५.०० पर्यंत,अनु. क्र. १,३आणि ८ साठी १६.१०.२०२६ रोजी १५.०० पर्यंत, ते १५.०० नंतर उघडण्यात येतील. २. प्रस्तावित निविदादारांनी निविदाचे संपूर्ण तपशील आणि असल्यास, शुद्धीपत्रक यासाठी वेबसाईट www.ireps.gov.in पहावी, अशी विनंती आहे. **३.** निविदादार वरील ई-निविदात केवळ www.ireps.gov.in च्या माध्यमातूनच सहभागी होऊ शकतात आणि ई-निविदाच्या ऐवजी हस्ते प्रस्ताव प्रस्तुत करण्यास परवानगी नाही. जर, प्रस्ताव हस्ते प्रस्तुत करण्यात आले तर ते उघडले जाणार नाहीत की त्यांचा विचार केला जाणार नाही. **४.** बोली सुरक्षा ही एक तर ई-पेमेंट गेटवेद्वारे रोख भरावी किंवाशेड्यूल्ड व्यावसायिक भारतीय बँकेद्वारे बँक हमी बाँड म्हणून प्रस्तुत करावे किंवा निविदा दस्तावेजात नमूद केल्याप्रमाणे भरावी. **५.** अधिक चौकशीसाठी संपर्क करा : वरीष्ठ विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे) कार्यालय, मध्य रेल्वे येथे दूरध्वनी ०२२-६७४५५३२३ वर संपर्क साधावा. **६.** निविदा सार्वजनिक खरेदी धोरण आदेश २०१७ दिनांक १६.०९.२०१७ चे अनुपालन करते. निविदांचे संपूर्ण तपशील वेबसाईट www.ireps.gov.in वर उपलब्ध आहेत. निविदांचे संपूर्ण तपशील वरीष्ठ विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे) कार्यालय, मुंबई सीएसएमटी यांच्या ''सूचना फलका'' वरही उपलब्ध आहेत.
AK-613
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा